महाराष्ट्र शासन

# सहाय्यक आयुक्त समाज कल्याण कार्यालय, पुणे

डॉ. बाबासाहेब आंबेडकर, सामाजिक न्याय भवन, स.नं.१०४/१०५, विश्रांतवाडी रोड, पोलिस स्टेशन समोर, येरवडा पुणे
दुरध्वनी व फॅक्स क्र.०२० २९७०६६११
E-mail:-acswopune@gmail.com

जा.क्र.सआसकपुणे/स्वाधार अर्ज मुदत / २०२४-२५ /४३३८ दि..१५.१०..२०२४

प्रति,

अधिष्ठाता/संचालक/प्राचार्य/रजिस्टर (सर्व)

--------------------------------------------

--------------------------------------------

पुणे जिल्हा.

विषय :- सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षासाठी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेचे अर्ज दि. ३०/११/२०२४ पर्यंत स्विकारण्याबाबत....

संदर्भ :- १) आयुक्तालयाचे परिपत्रक क्र.२४९४,दि ३१/०७/२०२४.
२) मा. आयुक्त,समाज कल्याण,महाराष्ट्र राज्य पुणे यांचे पत्रक्र.३२५३ दि.१४/१०/२०२४.

उपरोक्त संदर्भ क्र. १ अन्वये नमूद केल्यानुसार आयुक्तालयाचे संदर्भ परिपत्रकान्वये शासकीय वसतिगृह प्रवेश व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना https://hmas.mahait.org या पोर्टलवर ऑनलाईन करण्यात आलेल्या आहेत.याबाबतचे अर्ज ऑनलाईन पोर्टलद्वारे स्विकारण्यात येत आहेत.

संदर्भ क्र.२ अन्वये काही अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रिया अद्यापही सुरु आहेत हि बाब लक्षात घेऊन विद्यार्थ्यांना चालू सन २०२४-२५ या वर्षासाठी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेचे अर्ज दि. ~~३०/१०/२०२४~~ ३०/११/२०२४ पर्यंत करण्यास मुदत राहील असे कळविण्यात आले आहे.

अनुसूचित जाती व नवबौद्ध प्रवर्गातील ज्या विद्यार्थ्यांनी वसतिगृह प्रवेशासाठी ऑनलाईन पोर्टलद्वारे दिलेल्या मुदतीत ऑनलाईन अर्ज सदर केलेले आहेत आणि या प्रवर्गातील ज्या विद्यार्थ्यांना वसतिगृहात प्रवेश मिळालेला नाही अश्या सर्व विध्यार्थ्यांचे अर्ज ऑनलाईन प्रणालीद्वारे आपोआप स्वाधार योजनेसाठी वर्ग होणार आहेत अश्या विद्यार्थ्यांनी स्वाधार योजनेसाठी नव्याने अर्ज सादर करण्याची आवश्यकता नाही.तरी याबाबतची माहिती सर्व महाविद्यालयांनी सूचना फलकावर प्रदर्शित करावी.

आपला विश्वासु

(विशाल लोंढे)
सहाय्यक आयुक्त
समाज कल्याण,पुणे.

प्रत माहितीस्तव सविनय सादर :-

१. मा.सहआयुक्त, (शिक्षण) समाज कल्याण आयुक्तालय म.रा.पुणे.
२. मा. प्रादेशिक उपआयुक्त, समाज कल्याण, पुणे विभाग,पुणे